ePaper
'पाकिस्तान अन् कतारमध्ये प्रसारमाध्यमांना पूर्ण स्वातंत्र्य नाही'
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

पुणे-नाशिक महामार्गावरील कोंडी कायम

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 21 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आरोपी निर्दोष

# पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणातील सर्व आरोपी निर्दोष..!





**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यभरात गाजलेल्या पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणामध्ये माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. माफीच्या साक्षीदाराने दिलेल्या साक्षीच्या आधारावर शिक्षा देता येत नाही. माफीच्या साक्षीदाराची साक्ष ही विश्वासार्ह नाही, असे सांगत मुंबईतील विशेष सीबीआय न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी संशयाचा फायदा देत सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.**

या प्रकरणी सुरुवातीला कळंबोली पोलिसांनी तपास केला होता. पुढे हा तपास सीबीआयकडे वर्ग करण्यात आला होता. या प्रकरणी तपास केल्यानंतर सीबीआयने राज्याचे माजी गृहमंत्री असलेल्या पद्मसिंह पाटील यांच्यासह नऊजणांविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. तर आरोपी पद्मसिंह पाटील यांच्या वतीने सुमारे १,२५० पानांचे लेखी निवेदन न्यायालयात सादर करण्यात आले होते.

दरम्यान, आज या प्रकरणी निकाल सुनावताना न्यायमूर्तींनी तपासात राहिलेल्या त्रुटींकडे आणि माफीच्या साक्षीदाराने वारंवार बदललेल्या साक्षीवर बोट ठेवले. या प्रकरणातील माफीचा साक्षीदार बनलेल्या आरोपीने आपली साक्ष वारंवार बदलली. त्यामुळे त्याने दिलेली साक्षही ग्राह्य धरता येणार नाही, असे न्यायमूर्तींनी निकाल देताना नमूद केले आणि सर्व आरोपींना संशयाचा फायदा देत त्यांची निर्दोष मुक्तता केली.

### कोण कोण होते मुख्य आरोपी

- पद्मसिंह पाटील
- सतीश मंदाडे
- मोहन शुक्ल
- शशिकांत कुलकर्णी
- कैलाश यादव
- दिनेश तिवारी
- पिंटू सिंह
- छोटे पांडे

### नेमकं प्रकरण काय?

काँग्रेसचे नेते असलेल्या पवनराजे निंबाळकर यांची ३ जून २००६ रोजी हत्या करण्यात आली होती. पवनराजे निंबाळकर हे मुंबईहून उस्मानाबादकडे जात असताना नवी मुंबईतील कळंबोली येथे त्यांची मोटार अडवून बेछूट गोळीबार करण्यात आला होता. त्यात पवनराजे निंबाळकर आणि त्यांच्या कारचा चालक समद काझी याचा मृत्यू झाला होता. पवनराजे यांचे राजकीय प्रतिस्पर्धी असलेल्या पद्मसिंह पाटील यांनी सुपारी देऊन त्यांची हत्या घडवल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच या प्रकरणात त्यांच्या पत्नी आनंदीदेवी निंबाळकर या फिर्यादी आहेत.

# पोर्शे प्रकरणात विशाल अग्रवाल पुन्हा अडचणीत

## व्हॉट्सॲप स्टेटसवरील कथित जल्लोषाच्या व्हिडिओवरून कारवाईची मागणी

**महाईन्यूज । पुणे**

**कल्याणीनगर येथील गाजलेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणातील आरोपी बिल्डर विशाल अग्रवालच्या अडचणी पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मिळाल्यानंतर व्हॉट्सॲप स्टेटसवर कथितरीत्या जल्लोषाचा व्हिडीओ ठेवल्याचा ठपका ठेवत पुणे पोलिसांनी त्यांचा जामीन रद्द करण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी मंगळवारी (दि. २३ जून) सत्र न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. याकरिता विधी व न्याय विभागाची परवानगी देखील मिळवल्याचे त्यांना सांगितले.**



### जामिनाच्या अटींचा भंग केल्याचा मुद्दा कोर्टात मांडणार

दरम्यान, विशाल अग्रवाल याने हा व्हिडीओ २०२३ मधील जुना असल्याचा दावा केला होता. त्याचा जामीन मिळाल्यानंतरच्या कोणत्याही जल्लोषाशी संबंध नसल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले होते. मात्र, पोलिसांनी व्हिडीओ व्हायरल झाल्याची बाब गांभीर्याने घेतली आहे. व्हिडीओ जुना असला तरी तो जामिनानंतर लगेच स्टेटसवर ठेवणे हे मृतांच्या कुटुंबीयांच्या भावना दुखावणारे कृत्य असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. या प्रकरणातील संवेदनशीलता, देशभरात निर्माण झालेली चर्चा आणि मृतांच्या कुटुंबीयांची मानसिक अवस्था लक्षात घेता जामिनाच्या अटींचा भंग झाल्याचा मुद्दा न्यायालयात मांडला जाणार आहे. जामीन मिळाल्यानंतर जल्लोषाची चित्रफीत ही समाज माध्यमातील स्टेटसवर ठेवणे ही बाब मृतांच्या कुटुंबीयांची भावना दुखावणारी आहे, असे पोलिसांनी सांगितले आहे.

कल्याणीनगर येथील भीषण पोर्शे अपघातात दोन तरुण अभियंत्यांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणाने देशभरात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर पुराव्यांशी छेडछाड व गुन्ह्यात सहभाग आढळल्यानंतर विशाल अग्रवालला अटक केली होती. नंतर सर्वोच्च न्यायालयाने काही कठोर अटींसह त्याला जामीन मंजूर केला होता.

जामिनाच्या अटींनुसार मृतांच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारे मानसिक किंवा शारीरिक त्रास होईल, असे कोणतेही कृत्य करता येणार नाही. मात्र, जामीन मिळाल्यानंतर सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला. या व्हिडीओत विशाल अग्रवाल आनंदोत्सव साजरा करताना दिसत असल्याचा पोलिसांचा दावा आहे.

पुणे पोलिसांच्या तपासात संबंधित व्हिडीओ विशाल अग्रवालने स्वतःच्या व्हॉट्सॲप स्टेटसवर ठेवल्याचे समोर आले आहे. हा स्टेटस पाहिलेल्या दोन व्यक्तींचे जबाबही पोलिसांनी नोंदवून घेतले आहेत. हे जबाब आणि उपलब्ध डिजिटल पुरावे न्यायालयासमोर सादर करून जामिनाच्या अटींचे उल्लंघन झाल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात येणार आहे.

‘कल्याणीनगर अपघात प्रकरणात बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल याच जामीन रद्द करण्यासाठी पोलिसांकडून न्यायालयात अर्ज केला जाणार आहे. पुणे पोलिसांकडून २३ जून रोजी याबाबत सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला जाणार आहे’, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाकडून अगरवाल याला जामीन मंजूर करण्यात आला. त्यानंतर समाज माध्यमात अगरवाल आणि कुटुंबीय जल्लोष करतानाची कथित चित्रफीत समाज माध्यमात प्रसारित झाली. ‘पुणे पोलिसांनी या घटनेची दखल घेऊन अगरवाल याचा जामीन रद्द करण्यात यावा, यासाठी तयारी सुरू केली आहे. २३ जून रोजी न्यायालयात याचिका दाखल केली जाणार आहे. त्यासाठी राज्याच्या विधी आणि न्याय विभागाची परवानगी मिळवण्यात आली आहे’, असे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी पत्रकारांशी बोलताना नमूद केले.

कल्याणीनगर भागात भरधाव मोटारीने दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुण-तरुणीला धडक दिली होती. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात अगरवाल याच्या अल्पवयीन मुलासह मित्रांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यांच्या रक्ताचे नमुने बदलण्यासाठी अगरवाल आणि साथीदारांनी ससूनमधील डॉक्टरांशी संगनमत केले होते. ही बाब तपासात उघडकीस आल्यानंतर विशाल अगरवाल याला अटक करण्यात आली होती. त्याचा जामीन फेटाळण्यात आला होता. त्यानंतर अगरवालने सर्वोच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता.

सर्वोच्च न्यायालयाने कठोर अटी, शर्तीवर अगरवालचा जामीन मंजूर केला होता. जामीन मिळाल्यानंतर अगरवाल याची कुटुंबीयांसोबत जल्लोष करताना कथित चित्रफीत प्रसारित झाली होती. समाज माध्यमात ही चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर पोलिसांनी दोघांचे जबाब नोंदवून घेतले होते. जबाब आणि डिजिटल पुरावे न्यायालयात सादर केले जाणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने अगरवाल याला घालून दिलेल्या अटींचा भंग झाल्याची माहिती न्यायालयात दिली जाणार आहे.

# पुणे विमानतळावर अडीच कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क (कस्टम) विभागाने मोठी कारवाई करत अडीच कोटी रुपये किमतीचा हायड्रोपोनिक गांजा जप्त केला आहे. बँकॉकहून पुण्यात दाखल झालेल्या आंतरराष्ट्रीय विमानातील एका बेवारस बॅगेतून तब्बल २१ किलो ५०० ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा आढळून आल्याने विमानतळावरील सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली आहे. या प्रकरणामागे आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी रॅकेटचा हात असण्याचे बोलले जात आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री बँकॉकहून पुणे विमानतळावर आलेल्या विमानातील प्रवाशांनी आपापले सामान ताब्यात घेतले. मात्र, एक बॅग दीर्घकाळ कन्व्हेयर बेल्टवर पडून होती. बराच वेळ उलटल्यानंतरही कोणीही त्या बॅगेवर दावा न केल्याने कस्टम विभागाच्या अधिकाऱ्यांना संशय आला. त्यांनी तत्काळ बॅग ताब्यात घेऊन तिची तपासणी केली. तपासणीदरम्यान बॅगेतून मोठ्या प्रमाणात हायड्रोपोनिक गांजा आढळून आला. या गांजाचे एकूण वजन २१.५ किलो असून, आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत सुमारे अडीच कोटी रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ सापडल्याने तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, हायड्रोपोनिक गांजा हा सामान्य गांजाच्या तुलनेत अधिक महाग आणि अधिक नशा देणारा मानला जातो. विशेष तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नियंत्रित वातावरणात त्याची लागवड केली जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात त्याला मोठी मागणी असून, त्याची तस्करी संघटित गुन्हेगारी टोळ्यांकडून केली जाते. ही बॅग नेमकी कोणत्या प्रवाशाची होती आणि भारतात ती कोणाकडे पोहोचविण्याचा कट रचला होता, याचा शोध कस्टम विभाग घेत आहे. यासाठी संबंधित विमान कंपनीचे रेकॉर्ड, सामानावरील टॅग, प्रवाशांची माहिती तसेच विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू करण्यात आली आहे. या कारवाईमुळे पुणे विमानतळाचा वापर करून अमली पदार्थांची तस्करी करण्याचा आणखी एक प्रयत्न उधळून लावण्यात यश आले आहे.

# पुणे-नाशिक महामार्गावरील कोंडी कायम

## भूसंपादन व निधी वितरणातील विलंबामुळे महत्त्वाकांक्षी आठ पदरी एलिव्हेटेड मार्ग कागदावरच

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे-नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते राजगुरुनगर दरम्यानच्या साधारण २८ ते ३० किलोमीटर अंतरातील वाहतूक कोंडीने आता अत्यंत उग्र रूप धारण केले आहे. वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांना हा त्रास नित्याचा झाला आहे. या समस्येतून कायमस्वरूपी सुटका करण्यासाठी केंद्र सरकारने ९ ऑगस्ट २०२४ रोजी तब्बल २७,८०७.७६ कोटी रुपयांच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा आठ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर (उन्नत मार्ग) प्रकल्पाला मंजुरी दिली होती.**



जमीन हस्तांतरणात होत असलेल्या या विलंबामुळे थेट केंद्र सरकार अत्यंत संतप्त झाले असून, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे सचिव व्ही. उमाशंकर यांनी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना थेट खरमरीत पत्र पाठवून आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पत्रात त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर तातडीने जमीन हस्तांतरित झाली नाही, तर सुरू असलेली निविदाप्रक्रिया धोक्यात येऊ शकते आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (NHAI) या संपूर्ण प्रकल्पाचा फेरविचार करावा लागू शकतो. या महामार्गाचे काम रखडण्यामागे भूसंपादन आणि निधी वितरणाचा एक मोठा पेच निर्माण झाला आहे.

दुसरीकडे, या संपूर्ण प्रशासकीय दिरंगाईचा फटका स्थानिक नागरिक, नोकरदार, विद्यार्थी आणि उद्योजकांना बसत असून त्यांचा अमूल्य वेळ आणि इंधन वाया जात आहे. महामार्गावरील भोसरी एमआयडीसीतील गुडविल चौक, लांडेवाडी चौक, राजा शिवछत्रपती चौक तसेच शीतल बाग परिसर आणि मोशी उपबाजार (बोऱ्हाडे चौक) ते मोशी गावठाण चौक, भारतमाता चौक व टोलनाका या दरम्यान दररोज सकाळ-सायंकाळ वाहनांच्या किलोमीटर लांब रांगा लागतात. चाकण औद्योगिक क्षेत्रातील अवजड वाहतूक, कंटेनर आणि लॉजिस्टिक क्षेत्रासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असूनही तो रखडल्याने नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

प्रकल्प सुरू करण्यासाठी चाकण औद्योगिक क्षेत्रासह पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील भोसरी, मोशी तसेच चाकण परिसरातील नाणेकरवाडी, कुरुळी आणि चिंबळी या गावांमध्ये सुमारे १४.१ हेक्टर जमीन संपादन करणे आवश्यक आहे. राज्य सरकारने ही जमीन देण्याचे आणि भूसंपादनासाठी ६२० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याचे आश्वासन दिले होते. याच आश्वासनावर विश्वास ठेवून एनएचएआयने तातडीने निविदा प्रक्रिया सुरू केली होती; परंतु हा निधी अद्याप पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे वर्ग करण्यात आलेला नाही. १०० टक्के भूसंपादन झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामाला सुरुवात न करण्याची अट असल्याने संपूर्ण प्रक्रिया खोळंबली आहे.

> पुणे-नाशिक महामार्गावरील मोशी येथील सेवा रस्ता आणि महामार्गाच्या रुंदीकरणाचा संपूर्ण आराखडा आणि अंदाजपत्रक तयार असून, निविदा प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. मात्र, या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या एकूण १४ हेक्टर जमिनीपैकी 'पीएमआरडीए'कडून १०.८ हेक्टर आणि 'पीसीएमसी'कडून ३.२ हेक्टर जमिनीचे संपादन होणे अजून बाकी आहे. १०० टक्के भूसंपादन झाल्याशिवाय प्रकल्प प्रत्यक्ष सुरू न करण्याची अट असल्याने हे काम रखडले आहे. राज्य सरकारकडून संबंधित प्राधिकरणांना निधी उपलब्ध झाल्यानंतर भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होईल.
>
> **- पंकज प्रसाद, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण NHAI.**

### रस्ता कधी होणार?

विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवड महापालिकेने तब्बल चार वर्षांपूर्वीच मोठी अतिक्रमण हटाव मोहीम राबवून रस्त्यातील बांधकामे हटवली होती; परंतु पुढील ठोस नियोजनाअभावी आणि राज्य सरकारकडून निधी न मिळाल्याने कामाला मुहूर्त लाभू शकलेला नाही. उलट, पाडलेल्या बांधकामांचा राडारोडा अजूनही अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला पडून राहिल्याने संपूर्ण परिसराचे विद्रुपीकरण झाले असून, अपघातांचा धोका वाढला आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील 650 शाळांना फायर सर्टिफिकेटसाठी नोटीस

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शाळांची अग्निसुरक्षा नोंदणी आणि अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र (फायर सर्टिफिकेट) बंधनकारक आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरातील शाळांनी फायर सर्टिफिकेट घेण्याकडे दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महापालिकेच्या अग्निशमन विभागाने तब्बल 650 शाळा आणि शैक्षणिक संस्थांना फायर सर्टिफिकेट घेण्यासाठी नोटीस बजावली आहे.**



### सुरक्षेची हमी देणे संस्थेची जबाबदारी

शहरातील सर्व शाळांनी फायर सर्टिफिकेट घेतले नसल्याचे पडताळणीत आढळून आले आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षेची हमी देणे ही शैक्षणिक संस्थाचालक व मालकांची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे नोंदणी आणि अधिकृत फायर सर्टिफिकेट घेणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळाचालकांनी नियमांचे पालन करणे आणि कोणत्याही संभाव्य दुर्घटनेपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करणे महापालिकेचे ध्येय आहे, असे महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी सांगितले.

महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करून दहा दिवसांत फायर सर्टिफिकेट घेण्याचे सूचित करण्यात आले आहे.

शहरात 540 खासगी तर, 110 महापालिकेच्या अशा एकूण 650 शाळा आहेत. उन्हाळ्याची सुटी संपून 15 जूनपासून शाळा सुरू झाल्या आहेत. तर, काही इंग्रजी माध्यमाच्या शाळा पूर्वीच सुरू झाल्या आहेत. शाळांमध्ये विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी अग्निसुरक्षा उपाय असणे गरजेचे आहे.

महापालिकेच्या नियमानुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेकडे अग्निशमन विभागाचे फायर सर्टिफिकेट असणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व शाळांना अग्निशामक सुरक्षा प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. सर्व शाळांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना करणे, त्या कार्यान्वित ठेवणे हे संस्थाचालकांची जबाबदारी आहे. मान्यताप्राप्त संस्थेकडून विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

शाळा इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा सुरू आहे का ? याबाबत शासन मान्य संस्थेकडून फायर ऑडिट करून घेण्यात यावे. ऑडिटमध्ये काही आक्षेप निघाल्यास त्याची पूर्तता करावी. फायर ऑडिटचा अहवाल महापालिकेस सादर करावा. शैक्षणिक संस्थेची नोंदणी व आवश्यक सुरक्षा अग्नी सुरक्षितता उपाययोजना केल्यास गंभीर दुर्घटना टाळण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांना सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यासाठी नियमित मॉक ड्रिलचे आयोजन करणे आवश्यक आहे. शाळा व्यवस्थापनाने अग्निसुरक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती करून सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करावे.



## भूमिका

**भारतातील लोक उन्हाळी मान्सूनची आतुरतेने वाट पाहतात, कारण हा मान्सून सोबत पाऊस घेऊन येतो आणि उष्णतेपासून लोकांना दिलासा देतो. भारतीय हवामान विभागाने प्रशांत महासागरात एल निनो परिस्थिती विकसित झाल्याचे स्पष्ट केले आहे. मान्सूनचे ढग गायब झाल्याने देशात पावसाची मोठी घट पाहायला मिळत आहे.**

# यंदाचा मान्सून कुठे हरवला? ये रे ये रे पावसा



रोज सातत्याने हवामानात बदल पाहायला मिळत असल्याने पावसाबाबत दिवसेंदिवस चिंता व्यक्त होत आहे. जूनचा अर्धा महिना सरला तरी हवा तशा पावसाची दमदार सुरवात झालेली नाही, यामुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे.

सर्वात मोठी चिंता केवळ विलंबाची नाही, तर संपूर्ण हंगामात सरासरीपेक्षा कमी पावसाच्या अंदाजाची आहे. यामुळे शेतकऱ्यांपासून ते शहरी रहिवाशांपर्यंत सर्वांची चिंता वाढली आहे. भारतात, मान्सून केवळ हवामानाशीच नव्हे, तर कृषी, महागाई, वीज आणि संपूर्ण जलप्रणालीशी जोडलेला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानंतरही, नैऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये वेळेवर पोहोचला नाही. भारतीय हवामान विभागाने आता 23 जून दरम्यान मोसमी पाऊस सर्वत्र आपले आगमन करेल असे भाकीत केले आहे. दरम्यान, देशाच्या अनेक भागांमध्ये तीव्र उष्णता कायम आहे. हवामान शास्त्रज्ञांच्या मते, एल निनोमुळे हा मान्सून नेहमीपेक्षा कमकुवत असू शकतो. भारतीय हवामान विभागाच्या मते, संपूर्ण हंगामात पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या 92 टक्क्यांपर्यंत पोहोचू शकतो. याचा परिणाम कृषी, महागाई आणि पाण्याच्या उपलब्धतेवर होऊ शकतो. सध्या, संपूर्ण देश मान्सूनच्या पुढील हालचालींकडे लक्ष ठेवून आहे. हवामान विभागाच्या मते, अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान समुद्रात मान्सूनच्या प्रगतीसाठी परिस्थिती अनुकूल होत आहे, परंतु अपेक्षित वेग अद्याप गाठला गेलेला नाही. भारतीय हवामान विभागाच्या मते, पुढील 72 तासांत परिस्थिती स्पष्ट होऊ शकते. शास्त्रज्ञांच्या मते, सागरी वाऱ्यांची दिशा आणि वातावरणातील आर्द्रतेची पातळी अद्याप पूर्णपणे अनुकूल नाही. यामुळेच मान्सूनच्या अधिकृत आगमनाला विलंब झाला आहे.

मान्सून हा मूळचा अरबी भाषेतील शब्द. अरबीतील 'मौसिन' या शब्दावरून मान्सूनची उत्पत्ती झालीय; जिथं, अरबी समुद्रात नौकांसह उतरलेल्या खलाशांनी 'मॉवसिम' या शब्दाचा सर्वप्रथम वापर केला. अरबी खलाशांनी समुद्रातील वाऱ्यांना त्यांनी 'मान्सून' म्हणण्यास सुरुवात केली. तिथं अरबी भाषिकांनी 'मौसिन' किंवा 'मॉवसिम' या शब्दांचा वापर केलेला असतानाच ब्रिटीशांनी या शब्दाचा सर्वप्रथम वापर केल्याचंही सांगण्यात येतं. आशिया खंडात जून ते सप्टेंबर या काळात येणारा पाऊस म्हणजे मान्सून, असाही त्याचा आणखी एक अर्थ. मान्सूनची नेमकी सुरुवात कधीपासून झाली याविषयी अनेकांनी दावे केल्याचं पाहायला मिळतं. असं म्हटलं जातं की, मान्सून 5 कोटी वर्षांपूर्वी जन्मला आणि हा तोच काळ होता जेव्हा भारतीय उपखंड तिबेटन पठारांच्या दिशेनं पुढे सरकत होता. मान्सूनचं सध्याचं स्वरुप पाहता सर्वप्रथम तो 80 लाख वर्षांपूर्वी उदयास आल्याचं म्हटलं जातं.

## प्रासंगिक »

### चांगला राजा

**एकदा एका तळ्यातला बेडकांना वाटले, की आपल्याला एक राजा हवा. म्हणून त्यांनी देवाकडे तशी मागणी केली. तेव्हा देवाला हसूच आले व त्याने 'हा घ्या राजा !' म्हणून एक लाकडी ओंडका तळ्यात टाकला. तो पाण्यावर पडताच पाणी उसळले.**

ते पाहून सगळे बेडूक घाबरले आणि बाजूला जाऊन बसले. थोड्या वेळाने पाणी शांत झाल्यावर तो ओंडका काही हालचाल करीत नाही असे पाहून त्या-च्यावर चढले व उड्या मारू लागले.

मग त्यांना वाटले की या राजापेक्षा दुसरा चांगला राजा हवा. तेव्हा त्यांनी देवाची प्रार्थना करून दुसरा चांगला राजा पाठवण्याची विनंती केली. देवाने एक बगळा पाठविला. त्याने बेडकांना मारून खायला सुरुवात केली. म्हणून बेडकांनी देवाकडे अजून चांगल्या राजाची मागणी केली.


ते ऐकून देव म्हणाला, 'मी तुम्हांला पहिला राजा पाठवला होता तो तुम्हांला आवडला नाही. आता तुमचं कर्म तुम्हीच भोगा.'

- तात्पर्य : चांगले संस्कार हेच उत्तम चारित्र्याचा भक्कम पाया असतात.

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे संपूर्ण जगाचे लक्ष मध्यपूर्वेकडे लागले होते. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीतील तेलवाहतुकीवर झालेल्या परिणामामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला.

# इराणचा डाव यशस्वी; महासत्तेला माघार घ्यावीच लागली!





भारतासह अनेक देशांमध्ये इंधनदर, महागाई आणि पुरवठा साखळीवरील दबाव वाढला होता. अशा परिस्थितीत अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या शांतता करारामुळे जगाला मोठा दिलासा मिळाला आहे.

या संघर्षाची सुरुवात इराणच्या अणुकार्यक्रमावरून झाली होती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेत इराणवर कठोर निर्बंध लादले. युद्धाच्या काळात इराणच्या काही बंदरांची नाकेबंदी करण्यात आली, तर त्याला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्याचे प्रयत्नही झाले. मात्र, अखेरीस झालेल्या करारात अमेरिकेलाच अनेक मुद्द्यांवर माघार घ्यावी लागल्याचे दिसून येते.

करारानुसार होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा सर्व देशांसाठी निर्बंधमुक्त खुली राहणार आहे. इराणवरील आर्थिक निर्बंध हटवण्यात आले असून, गोठवलेला अब्जावधी डॉलरचा निधीही खुला करण्यात येणार आहे. त्याचबरोबर युद्धामुळे झालेल्या नुकसानीच्या पुनर्बांधणीसाठी मोठ्या गुंतवणुकीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे आर्थिक आणि सामरिक दोन्ही स्तरांवर इराणची स्थिती मजबूत झाल्याचे मानले जात आहे.

अणुकार्यक्रम हा या करारातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता. इराणने अण्वस्त्रे विकसित न करण्याची हमी दिली असली तरी युरेनियम संवर्धन कार्यक्रम पूर्णपणे बंद करण्यात आलेला नाही. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या देखरेखीखाली त्यावर नियंत्रण ठेवले जाणार आहे. दुसरीकडे, इराणची बॅलिस्टिक क्षेपणास्त्र क्षमता कायम ठेवण्यात आली आहे. याच मुद्द्यावर अमेरिकेने पूर्वी कठोर भूमिका घेतली होती. त्यामुळे या करारात इराणने आपली प्रमुख सामरिक ताकद टिकवून ठेवण्यात यश मिळवले आहे.

या संघर्षातून एक महत्त्वाचा धडा समोर येतो. युद्धामुळे दोन्ही बाजूंचे नुकसान होते, मात्र संवादातून प्रश्न सोडविणे अधिक परिणामकारक ठरते. वाढती महागाई, ऊर्जा संकट आणि आर्थिक आव्हाने यांचा सामना करणाऱ्या जगाला युद्ध नव्हे तर स्थैर्याची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



रुपी जडले लोचन ।
पायी स्थिरावले मन॥१॥

देहभाव हरपला ।
तुज पाहतां विठ्ठला ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# यशवाडीच्या हनुमान मंदिरात मोठी दुर्घटना

## सभामंडपाचे बांधकाम कोसळले; ५ भाविकांचा मृत्यू, अनेक भाविक जखमी

**महाईन्यूज । मानवत**

**मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध त्रिमूर्ती हनुमान मंदिरात सुरू असलेल्या सभामंडपाच्या बांधकामाचा स्लॅब शनिवारी (दि.२०) दुपारी सुमारे 3 वाजण्याच्या सुमारास कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत 4 ते 5 भाविकांचा मृत्यू झाला. तर 20 ते 25 भाविक गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.**

मानवत-परभणी राष्ट्रीय महामार्गावरील कोल्हा शिवारात असलेल्या यशवाडी येथील त्रिमूर्ती हनुमान मंदिराला परिसरात विशेष धार्मिक महत्त्व आहे. दर शनिवारी विविध जिल्ह्यांतील हजारो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. मंदिर परिसरात सध्या गाभारा व सभामंडपाच्या विस्ताराचे काम युद्धपातळीवर सुरू होते. या बांधकामात मोठ्या प्रमाणावर दगडांचा वापर करण्यात येत होता.

शनिवारी दर्शनासाठी मोठी गर्दी झालेली असताना बांधकामाचा काही भाग अचानक कोसळला. विशेषतः दगडी बांधकामाचा भाग भाविकांवर पडल्याने अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले. या दुर्घटनेत काही भाविकांचा जागीच मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

घटना घडताच उपस्थित भाविकांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले. मानवत, परभणी, सेलू आणि पाथरी येथून रुग्णवाहिका तसेच वैद्यकीय पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत. जखमींना उपचारासाठी परभणी येथील विविध रुग्णालयांत हलविण्यात येत असून प्रशासनाकडून मदत व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

दरम्यान, दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून प्रशासनाकडून अधिक तपास सुरू आहे.



मानवत तालुक्यातील यशवाडी मंदिराचा गाभारा कोसळून तीन भाविकांचा मृत्यू झाला असून काही भाविक जखमी झाले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश लांडगे यांनी या वृत्तास दुजोरा दिला.

गावात हनुमान मंदिराचे बांधकाम सुरू होते. शनिवार असल्याने मारुती मंदिरात दुपारी गर्दी होती. दुपारी तीन-साडेतीनच्या सुमारास तयार खांब निघाल्याने तीन भाविकांचा मृत्यू झाला आहे. जखमींना नजिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मृतांपैकी परभणी येथील मुन्नेश अग्रवाल वगळता अन्य कोणाचे नाव समजू शकते नाही. हनुमान मंदिराच्या गाभाऱ्याचे काम सध्या सुरू असून त्यासाठी लाकडी खांबाच्या आधारे उभारण्यात आलेल्या मंडपाचा काही भाग कोसळला.

घटना घडली तेव्हा मंदिरात ३० ते ३५ भाविक असावेत, असा अंदाज आहे. या घटनेत अनेकजण जखमी झाले असून त्यांना नजिकच्या रुग्णालयात हलविण्याचे काम गावकरी आणि प्रशासनाच्या मदतीने केले जात आहे. या घटनेत तिघांचा मृत्यू झाला.

### लाकडी खांबाच्या मंडपाचा काही भाग कोसळला

मृतांपैकी परभणी येथील मुन्नेश अग्रवाल वगळता अन्य कोणाचे नाव समजू शकलेले नाही. हनुमान मंदिराच्या गाभाऱ्याचे काम सध्या सुरू असून त्यासाठी लाकडी खांबाच्या आधारे उभारण्यात आलेल्या मंडपाचा काही भाग कोसळला. घटना घडली तेव्हा मंदिरात ३० ते ३५ भाविक उपस्थित असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेत अनेकजण जखमी झाले असून त्यांना नजिकच्या रुग्णालयात हलविण्याचे काम गावकरी आणि प्रशासनाच्या मदतीने करण्यात आले. या दुर्घटनेनंतर संपूर्ण यशवाडी गावात शोककळा पसरली असून भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नीट यूजी पुनर्परीक्षेसाठी दोन लाखांहून अधिक कर्मचारी सज्ज

**महाईन्यूज । मुंबई**

**नीट यूजी पेपर फुटीप्रकरणानंतर रविवारी होणारी पुनर्परीक्षा सुरळीत व पारदर्शक पद्धतीने पार पडावी यासाठी राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था तयार केली आहे. या सुरक्षा व्यवस्थेबरोबरच परीक्षा घेण्यासाठी देशभरामध्ये तब्बल दोन लाखांहून अधिक कर्मचारी सज्ज ठेवले आहेत.**



### जिल्हा प्रशासन सज्ज

परीक्षा सुरळीत आणि निष्पक्ष पद्धतीने व्हावी यासाठी एनटीएने दोन लाखांहून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. यामध्ये ६७४ शहर समन्वयक, ६ हजार ६६९ निरीक्षक, केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक यांच्याबरोबरच परीक्षेवेळी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा, गोपनीय परीक्षा साहित्याची वाहतूक करण्यासाठी विशेष सुरक्षा पथके, परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र सुरक्षारक्षक तसेच जिल्हा प्रशासन सज्ज ठेवण्यात आले आहे.

देशातील ५५१ शहरे आणि परदेशातील १४ शहरांमध्ये नीट यूजी पुनर्परीक्षा होणार आहे. या परीक्षेला तब्बल २२.७९ लाख विद्यार्थी बसणार आहेत. रविवारी दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ मिनिटे या वेळेत लेखी पद्धतीने ही परीक्षा होणार आहे. परीक्षेत अपंग विद्यार्थ्यांना अतिरिक्त वेळ देण्यात येणार असून, या विद्यार्थ्यांना सायंकाळी ६.२० वाजेपर्यंत परीक्षा देता येणार आहे. ही परीक्षा यशस्वी, गैरप्रकारविरहीत आणि सुरक्षितरित्या, सुरळीत पार पडावी यासाठी एनटीएने विविध यंत्रणांच्या समन्वयातून व्यापक नियोजन केले आहे.

परीक्षेची गोपनीयता आणि विश्वासार्हता कायम राखण्यासाठी एनटीएने बहुस्तरीय सुरक्षा आराखडा तयार केला आहे. गोपनीय साहित्याची सीलबंद पद्धतीने वाहतूक, जीपीएस-सुसज्ज वाहनांसह पोलीस बंदोबस्त, सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही देखरेख आणि त्याचे केंद्रीकृत नियंत्रण कक्षाशी जोडलेले थेट निरीक्षण यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना केंद्रात प्रवेश देण्यापूर्वी त्यांची उच्च-संवेदनशीलता असलेल्या मेटल डिटेक्टरद्वारे तपासणी केली जाणार आहे. तसेच तोतयागिरी रोखण्यासाठी आधार-आधारित बायोमेट्रिक पडताळणीची व्यवस्था करण्यात आली आहे. समाजमाध्यमांवरही सतत लक्ष ठेवले जात असून अफवा किंवा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सायबर गुन्हे विभाग, भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि केंद्रीय अन्वेषण विभाग यांना सज्ज ठेवण्यात आले आहे.

# राम मंदिर देणगी घोटाळा?

## ६० किलो चांदीसह मौल्यवान हार आणि पादुका गायब, SIT कडून चौकशी सुरू

महाईन्यूज । अयोध्या

**अयोध्येतील भव्य राम मंदिरात अर्पण करण्यात आलेल्या मौल्यवान वस्तू आणि देणग्यांमध्ये घोटाळा झाल्याचा संशय आता पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. राम मंदिराच्या देणगी रेकॉर्डमधून तब्बल ६० किलो चांदीच्या विटा गायब झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. राम लल्लाच्या 'प्राण प्रतिष्ठा' सोहळ्यादरम्यान या विटा मंदिराला दान करण्यात आल्या होत्या आणि त्या मंदिराच्या पायाभरणीत वापरल्या जाणार होत्या. याप्रकरणी सध्या विशेष तपास पथक सखोल तपास करत आहे.**



गेल्या सहा दिवसांपासून 'एसआयटी'चे पथक या चांदीच्या विटांच्या कागदपत्रांची आणि सध्याच्या स्थितीची पडताळणी करत आहे. मात्र, अधिकृत रेकॉर्डमध्ये या चांदीची नोंद, साठवणूक किंवा वापराबाबत कोणतीही स्पष्ट माहिती पोलिसांना मिळालेली नाही.

दुसरीकडे, चांदी दान करणाऱ्या 'ज्वेलर्स असोसिएशन'चे अध्यक्ष अनुराग रस्तोगी यांनी सांगितले की, देशभरातील सराफा व्यापाऱ्यांच्या मदतीने ही ६० किलो चांदी गोळा करून मंदिराला देण्यात आली होती. या दानाची अधिकृत पावतीही त्यांच्याकडे आहे. परंतु, पायाभरणीच्या कार्यक्रमात किंवा नंतरच्या बांधकामात या विटा कुठेही दिसल्या नाहीत आणि त्यानंतर त्या गायब झाल्या. या प्रकरणाचे गूढ वाढल्याने 'एसआयटी'ने राम लल्लाचे चार पुजारी आणि दागिने-देणग्यांची देखरेख करणारे कृष्णदेव तिवारी यांची चौकशी केली आहे. मात्र, तिवारी यांनी या चांदीच्या विटांविषयी कोणतीही माहिती नसल्याचे म्हटले आहे. एवढेच नाही तर मंदिरातून एक मौल्यवान हार आणि 'चरण पादुका' देखील गायब झाल्याचा संशय असून, त्याबद्दलही त्यांनी अनभिज्ञता दर्शवली आहे. याशिवाय, देणगी व्यवस्थापन पाहणारे ट्रस्टचे डॉ. अनिल मिश्रा यांचीही पोलिसांकडून चौकशी करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे आवाहन

या प्रकरणावरून राजकीय वातावरण तापले असताना, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अयोध्येला भेट देऊन तपासाचे समर्थन केले. ते म्हणाले, "राम मंदिर ट्रस्टच्या विनंतीवरूनच ही 'एसआयटी' चौकशी सुरू करण्यात आली आहे. यातून दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल. ज्या भक्तांनी मंदिरासाठी ५०० वर्षे वाट पाहिली, त्यांनी अयोध्येची नाहक बदनामी न करता, 'एसआयटी'चा अहवाल येईपर्यंत आणखी १५ दिवस संयम ठेवावा.

## 'पाकिस्तान अन् कतारमध्ये प्रसारमाध्यमांना पूर्ण स्वातंत्र्य नाही'

महाईन्यूज । अमेरिका

**अमेरिका आणि इराण युद्ध अखेर तीन महिन्यांच्या कालावधीनंतर संपलं आहे. युद्ध समाप्तीच्या करारावर अखेर दोन्ही देशांकडून शिक्कामोर्तब करण्यात आलेलं आहे. गेल्या तीन महिन्यांपासून दोन्ही देशांत शांतता करारासंदर्भात चर्चा सुरू होत्या. अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करार व्हावा, यासाठी कतार आणि पाकिस्ताननेही मध्यस्थी केली होती. मात्र, आता अमेरिका-इराण शांतता कराराबाबत बोलताना अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी.व्हान्स यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे.**



त्यामुळे पुन्हा एकदा पाकिस्तानची नाचक्की झाल्याची चर्चा रंगली आहे.

जेडी व्हान्स यांनी एका पॉडकास्टमध्ये बोलताना इराणबरोबर सामंजस्य कराराचा तपशील जाहीर करण्यास झालेला विलंब हा अंशतः पाकिस्तानमधील प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याच्या मुद्द्यामुळे झाल्याचा आरोप केला आहे. कारण डोनाल्ड ट्रम्प यांनी १५ जून रोजी या तात्पुरत्या शांतता कराराची घोषणा केली होती. मात्र, या सामंजस्य कराराचा अधिकृत मसुदा दोन दिवसांनंतर जाहीर करण्यात आला होता. त्या संदर्भातील कारण सांगताना पाकिस्तान आणि कतारमध्ये प्रसारमाध्यमांना अमेरिकेसारखं पूर्ण स्वातंत्र्य नाही, असं जेडी व्हान्स यांनी म्हटलं आहे.

इराण शांतता कराराच्या अटी जाहीर करण्यास झालेल्या विलंबाबाबत प्रश्न विचारला असता जेडी व्हान्स यांनी म्हटलं की, "आम्हाला खरं तर तो करार जाहीर करायचा होता. पण मला वाटतं पाकिस्तान आणि कतारच्या प्रणालींमध्ये अमेरिकेतील 'फर्स्ट अमेंडमेंट' (अभिव्यक्ती स्वातंत्र्याची घटनात्मक तरतूद) किंवा प्रसारमाध्यमांच्या पूर्ण स्वातंत्र्यासारखी तरतूद नाही. प्रसारमाध्यमांचं पूर्ण स्वातंत्र्य नाही. पाकिस्तान आणि कतारमधील व्यवस्थांमध्ये प्रसारमाध्यमांचं स्वातंत्र्य किंवा 'फर्स्ट अमेंडमेंट' (पहिली घटनादुरुस्ती) यांसारख्या तरतुदी नाहीत. त्यामुळे पाकिस्तानमध्ये अशी अपेक्षा नसते की कराराचा मसुदा लगेच जनतेसमोर खुला केला जाईल.

### पाकिस्तानची नाचक्की?

जे.डी.व्हान्स यांच्या या विधानामुळे पाकिस्तानमधील अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यात झालेली घसरण पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. तसेच इराण शांतता कराराच्या अटी जाहीर करण्यास झालेल्या विलंबाला जेडी व्हान्स यांनी पाकिस्तानला जबाबदार धरलं आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा पाकिस्तानची नाचक्की झाल्याचं बोललं जात आहे. जेणेकरून ते त्यावर प्रश्न उपस्थित करू शकतील, तो पाहू शकतील, त्याचे विश्लेषण करू शकतील आणि स्वतःहून तो समजून घेऊ शकतील. पण आता आम्ही नक्कीच जाहीर करू", असं जे.डी.व्हान्स यांनी म्हटलं आहे. या वक्तव्यानंतर पाकिस्तानच्या पारदर्शकता आणि आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

### अमेरिका आणि इराणकडून शांतता करारावर स्वाक्षऱ्या

अमेरिका आणि इराणमधील युद्ध संपवण्यासाठी ऐतिहासिक शांतता करारावर दोन्ही देशांनी स्वाक्षरी केली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यामुळे आता अमेरिका आणि इराणमधील युद्ध अधिकृतरित्या संपलं आहे.



## 'गाढवाचं लग्न' पार्ट 2 येणार?

मराठी चित्रपटसृष्टीतील गाजलेल्या विनोदी चित्रपटांपैकी एक असलेल्या 'गाढवाचं लग्न' चित्रपटाने प्रेक्षकांना खळखळून हसवलं होतं. मकरंद अनासपुरे आणि राजश्री लांडगे यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट आजही रसिकांच्या मनात घर करून आहे. या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाबाबत 'गंगी' हे पात्र साकारणाऱ्या अभिनेत्री राजश्री लांडगे हिने एक मोठी हिंट दिली आहे. अभिनेत्री राजश्री लांडगे हिने एका मुलाखतीत, 'गाढवाचं लग्न पार्ट 2' या चित्रपटावर काम सुरू आहे. अद्याप अधिकृत घोषणा झालेली नसली तरी या प्रकल्पाला प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे गाढवाचं लग्न 2 प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची चर्चा अधिकृत मानली जात आहे. गाढवाचं लग्न 2 विषयी बोलताना राजश्री म्हणाली, "पार्ट 2 बाबत आम्ही काम करत आहोत. चित्रपट कधी येणार याबाबत अद्याप काही ठरलेले नाही. मात्र, हा प्रकल्प साकार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत."

# धनुष-मृणाल पुन्हा चर्चेत

धनुष आणि मृणाल ठाकूर यांच्या कथित नात्याबाबत गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या चर्चांना आता नवे आणि अनपेक्षित वळण मिळाले आहे. दोघांनी नात्यांतून आपले वेगळे मार्ग निवडले आहेत. मात्र, धनुष किंवा मृणाल यापैकी कुणीही त्यांच्या नात्याची किंवा ब्रेकअपची अधिकृत पुष्टी अद्यापर्यंत केलेली नाही. दोघेही एकमेकांना डेट करत असल्याची चर्चा 'सन ऑफ सरदार 2'च्या प्रीमियरदरम्यान झालेल्या एका प्रसंगानंतर सुरू झाली. या प्रमिअरला धनुषने हजेरी लावली होती. तसेच त्याने मृणालसोबत संवाद साधला. दोघांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला होता. त्यानंतर दोघे एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आले. यानंतर मृणाल धनुषच्या 'तेरे इश्क में'च्या रॅप-अप पार्टीमध्ये दिसली. तसेच तिने सोशल मीडियावर धनुषच्या बहिणींना फॉलो केल्याने चाहत्यांमध्ये त्यांच्या नात्याबाबतच्या चर्चांना आणखी बळ मिळाले. दरम्यान, फिल्मफेअरच्या वृत्तानुसार, कलाकारांच्या जवळच्या सूत्रांनी दावा केला आहे की धनुष आणि मृणाल यांनी नात्याचा शेवट करण्याचा आणि कथितरित्या वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, त्यांच्या विभक्त होण्यामागील कारण अद्याप समोर आलेले नाही. दोघांनीही त्यांच्या नात्याबाबत कधीही सार्वजनिकरित्या भाष्य केले नसल्याने या बातमीकडे केवळ एक अफवा म्हणून देखील पाहिले जात आहे. विशेष म्हणजे, मृणाल ठाकूरने याआधी डेटिंगच्या सर्व अफवा फेटाळून लावत धनुष हा तिचा चांगला मित्र असल्याचे स्पष्ट केले होते. तसेच 'सन ऑफ सरदार 2'च्या प्रीमियरला धनुषने लावलेली हजेरी ही अजय देवगणच्या निमंत्रणामुळे होती, त्याचा कोणत्याही वैयक्तिक नात्याशी संबंध नसल्याचेही तिने सांगितले होते.






# उर्मिलाचा संसार मोडला?

बॉलीवूडमधील ऊर्मिला मातोंडकर हिने आपल्या उत्कृष्ट अभिनयाने आणि सौंदर्याने ९० चा काळ गाजवला. 'रंगीला', 'भूत', 'कोण', 'एक हसीना थी', 'पिंजर' अशा एकाहून एक सरस आणि आव्हानात्मक चित्रपटांमध्ये काम करून तिने सिनेसृष्टीत आपले स्थान भक्कम केले. व्यावसायिक आयुष्यात यशाची शिखरे सर करणाऱ्या उर्मिलाच्या वैयक्तिक आयुष्यात मात्र गेल्या काही वर्षांत मोठे वादळ आले. ८ वर्षांचा सुखाचा संसार मोडल्यानंतर आता तिचा पूर्व पती मोहसीन अख्तर मीर याने दुसरे लग्न केल्याची बातमी समोर आली आहे, ज्यामुळे उर्मिला पुन्हा एकदा चाहत्यांमध्ये चर्चेत आली आहे. ऊर्मिलाने काश्मिरी व्यावसायिक मोहसीन अख्तरशी २०१६ मध्ये विवाह केला होता. मोहसीन ऊर्मिलापेक्षा वयाने १० वर्षांनी लहान होता. मात्र, लग्नाच्या आठ वर्षांनंतर, म्हणजेच २०२४ मध्ये या दोघांनी परस्पर संमतीने घटस्फोट घेत असल्याचे जाहीर केले. हा संसार मोडल्यानंतर अवघ्या काही काळातच मोहसीनने दुसरा विवाह केला आहे. सोशल मीडिया अकाउंटवरून मोहसीनने निधा भट्टसोबतच्या निकाहचे फोटो शेअर करत आपल्या आयुष्याची नवीन सुरुवात केल्याचे जाहीर केले. पूर्व पतीच्या या दुसऱ्या लग्नामुळे ऊर्मिलाच्या वैयक्तिक आयुष्यासोबतच तिच्या आर्थिक स्थितीबद्दल आणि लाइफस्टाइल बद्दल जाणून घेण्यासाठी चाहते अत्यंत उत्सुक आहेत. माध्यमाच्या रिपोर्ट्सनुसार, ऊर्मिलाची एकूण संपत्ती तिच्या पूर्व पतीपेक्षा खूप जास्त असून ती अत्यंत आलिशान जीवनशैली जगते. ऊर्मिलाची एकूण संपत्ती सुमारे ६८ कोटी रुपये आहे. ती सध्या चित्रपटांमध्ये फारशी सक्रिय नसली तरी जाहिराती आणि इतर माध्यमांतून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवते. ऊर्मिला आणि मोहसीन अख्तर मीर यांची प्रेमकहाणी खूप रंजक होती. या दोघांची पहिली भेट बॉलीवूडचे प्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांनी आयोजित केलेल्या एका पार्टीत झाली होती. या पार्टीत झालेल्या ओळखीचे रूपांतर आधी घनिष्ठ मैत्रीत झाले. काही काळ एकमेकांना डेट केल्यानंतर त्यांच्यातील प्रेम अधिक घट्ट झाले आणि त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. २०१६ मध्ये अत्यंत खाजगी पद्धतीने हा विवाह सोहळा पार पडला होता. परंतु, आठ वर्षे एकमेकांसोबत घालवल्यानंतर त्यांच्या वैवाहिक आयुष्यात काही अनपेक्षित अडचणी निर्माण झाल्या. या मतभेदांमुळे अखेर २०२४ मध्ये त्यांनी अधिकृतपणे घटस्फोट घेतला. त्यांच्या विभक्त होण्यामागचे नेमके आणि अचूक कारण अद्यापही समोर आलेले नाही, मात्र मोहसीनच्या दुसऱ्या लग्नामुळे या जुन्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे.

# रोहित शर्माची खास हॅट्रिक!

## लागोपाठ ३ कॅच घेत लक्ष्मण अन् धवनच्या खास रेकॉर्डशी बरोबरी

**महाईन्यूज । चेन्नई**

**भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरु आहे. या मालिकेतील तिसरा सामना चेन्नईच्या एमए चिंदबरम स्टेडियमवर सुरु आहे. या सामन्यात फलंदाजीला येण्याआधीच रोहित शर्मा आपल्या फिल्डिंगमुळे चर्चेत आला आहे. रोहितने स्लिपमध्ये फिल्डिंग करताना एकासारखेच ३ झेल घेतले आहे. मुख्य बाब म्हणजे,तिन्ही वेळेस गोलंदाज प्रसिध कृष्णा होता. तर फिल्डर रोहित शर्मा होता. प्रसिधने एकाच लाईनवर चेंडू टाकले आणि रोहितने एका पाठोपाठ ३ झेल घेत हॅट्रिक पूर्ण केली.**




तर झाले असे की, चेन्नईत सुरु असलेल्या या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानला सुरुवातीलाच मोठे धक्के बसले. प्रसिधने आधी रहमानुल्लाह गुरबाजला ५ धावांवर झेलबाद करत माघारी धाडलं. त्यानंतर प्रसिधच्या गोलंदाजीवर रहमत शाहला ५ धावांवर झेलबाद करत माघारी धाडलं. त्यानंतर पुन्हा एकदा प्रसिधने त्याच लाईनवर चेंडू टाकला, फलंदाजाने पुन्हा तीच चूक केली आणि चेंडू इब्राहिम जादरानच्या बॅटची कडा घेऊन रोहित शर्माच्या हातात गेला. इब्राहिम जादरान अवघ्या ३ धावा करुन माघारी परतला. अफगाणिस्तानच्या टॉप ऑर्डरच्या तिन्ही फलंदाजांचे सोपे झेल घेऊन रोहित शर्माने झेल घेण्याची खास हॅट्रिक पूर्ण केली.

रोहित शर्माने प्रसिध कृष्णाच्या गोलंदाजीवर लागोपाठ ३ झेल घेत एक खास रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. रोहित शर्मा हा एकाच गोलंदाजाच्या गोलंदाजीवर ३ झेल घेणारा तिसरा भारतीय ठरला आहे. याआधी वनडे क्रिकेटमध्ये एकाच गोलंदाजाच्या गोलंदाजीवर ३ झेल घेण्याचा रेकॉर्ड हा माजी भारतीय खेळाडू व्हीव्हीएस लक्ष्मण आणि शिखर धवनच्या नावावर आहे. व्हीव्हीएस लक्ष्मणने २००४ मध्ये इरफान पठाणच्या गोलंदाजीवर लागोपाठ ३ झेल घेऊन हा कारनामा केला होता. त्यानंतर २०१८ मध्ये शिखर धवनने जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर ३ झेल घेऊन हा रेकॉर्ड केला होता. आता २०२६ मध्ये रोहितने हा कारनामा केला आहे.

### प्रसिध कृष्णाची दमदार गोलंदाजी

या सामन्यातील सुरुवातीलाच प्रसिध कृष्णाने अफगाणिस्तानला ३ मोठे धक्के दिले. त्याने रहमानुल्लाह गुरबाजला ५, इब्राहिम जादरानला ११ आणि रहमत शाहला अवघ्या ५ धावांवर बाद करत माघारी धाडलं. त्यानंतर दार्विश रसूलीला १ आणि कर्णधार हशमतुल्ला शाहिदीला १०२ धावांवर बाद करत माघारी धाडलं आणि आपल्या ५ विकेट्स पूर्ण केल्या. अफगाणिस्तानकडून हशमतुल्ला शाहिदी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. तर अजमतुल्लाह ओमरजईने ५० धावा केल्या.

# FIFA WC सामन्यात मैदानावर हाणामारी! खेळाडू एकमेकांशी भिडले

**महाईन्यूज । तुर्की**

**फिफा विश्वचषक २०२६ मध्ये अटीतटीचे सामने खेळवले जात आहे. प्रत्येक गटातून बाद फेरी गाठण्यासाठी संघ शर्थीचे प्रयत्न करत आहेत. दरम्यान यजमान मेक्सिको व अमेरिका हे दोन संघ बाद फेरीसाठी पात्र ठरले. तर तुर्की व हेती हे दोन संघ स्पर्धेबाहेर झाले आहेत. तत्पूर्वी तुर्की व पेराग्वे यांच्यातील सामन्यादरम्यान दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये मैदानावर हाणामारी झाली, ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.**



फिफाच्या ड गटातील सामन्यादरम्यान तुर्की आणि पराग्वेच्या खेळाडूंमध्ये हाफटाइमच्या शिट्टीनंतर जोरदार वाद झाला. पहिल्या हाफमधील सामना अत्यंत चुरशीचा आणि संघर्षाने भरलेला झाल्यानंतर दोन्ही संघांचे खेळाडू एकमेकांशी भिडले. क्षणातच मैदानावर तणावपूर्ण वातावरण निर्माण झालं आणि दोन्ही संघांच्या अनेक खेळाडूंमध्ये धक्काबुक्की सुरू झाली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची चिन्हे दिसताच सामनाधिकारी, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफला हस्तक्षेप करावा लागला.

या गोंधळामुळे काही काळ सामना थांबवण्यात आला होता. अखेर अधिकाऱ्यांनी आणि दोन्ही संघांच्या व्यवस्थापनाने परिस्थिती शांत करत खेळाडूंना शांत केलं. या घटनेनंतर फिफाकडून शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सामन्यातील आणि हाफटाइममधील घडामोडींचा आढावा घेतल्यानंतर संबंधित खेळाडूंवर दंड किंवा निलंबनासारखी कारवाई केली जाऊ शकते.

संपूर्ण पहिला हाफ अत्यंत चुरशीचा आणि आक्रमक खेळाने भरलेला होता. अनेक कठोर टॅकल्स, धक्काबुक्की आणि शाब्दिक चकमकींमुळे मैदानावरील वातावरण आधीच तापलेलं होतं. पहिल्या ४५ मिनिटांचा खेळ संपल्याची शिट्टी होताच मध्यरेषेजवळ सुरू झालेल्या शाब्दिक वादाने अचानक उग्र रूप धारण केलं. यानंतर दोन्ही संघांचे अनेक खेळाडू एकमेकांशी भिडले. धक्काबुक्की, ढकलाढकली आणि आक्रमक हावभावांमुळे परिस्थिती काही काळ नियंत्रणाबाहेर गेली. टीव्हीवरील दृश्यांमध्ये दोन्ही संघांचे खेळाडू मोठ्या समूहात एकमेकांना भिडल्याचं दिसून आलं.

या गोंधळामुळे दोन्ही संघांच्या खेळाडूंना ड्रेसिंग रूममध्ये परत जाण्यास उशीर झाला. या घटनेनंतर संबंधित खेळाडूंवर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सामनाधिकारी या संपूर्ण घटनेचे फुटेज आणि अहवाल तपासून अतिरिक्त पिवळी किंवा लाल कार्डे द्यायची का, याबाबत निर्णय घेऊ शकतात.

फिफा विश्वचषक २०२६ मधून बाहेर पडणारा पहिला संघ ठरण्याची नामुष्की तुर्कीवर ओढवली. शुक्रवारी सॅन फ्रान्सिस्को बे एरिया स्टेडियमवर झालेल्या सामन्यात १० खेळाडूंनी खेळणाऱ्या पराग्वेकडून १-० असा पराभव स्वीकारल्यानंतर तुर्कीचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। रविवार ।
दि. 21 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

दापोडी परिसरातील एका अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम व जुगार साहित्य असा एकूण 26 हजार 740 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दापोडी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई आकाश श्रावण सोनवणे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. ही कारवाई 19 जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास जयभीमनगर, दापोडी येथील एस.आर.ए. योजनेच्या नव्या इमारतीमधील मोकळ्या जागेत करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,

आरोपी कृष्णा रामदुलार यादव (वय 30), राकेश विजय जाधव (वय 33), दीपक लक्ष्मण साळुंखे (वय 31) आणि विशाल दिलीप ओव्हाळ (वय 27) हे विनापरवाना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी 'तीन पत्ती' हा जुगार खेळताना आढळून आले. धाडीदरम्यान आरोपींकडून रोख रक्कम आणि जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम 12 (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास दापोडी पोलीस करीत आहेत. अवैध जुगाराविरोधातील मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून परिसरातील अशा बेकायदेशीर कृत्यांवर पोलिसांची नजर कायम असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## अवैध जुगार व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ

दरम्यान, या कारवाईमुळे परिसरात अवैध जुगार व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिसांनी नागरिकांना परिसरात कुठेही अवैध जुगार, मटका किंवा तत्सम बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याची माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे. अशा प्रकारच्या अवैध धंद्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीला चालना मिळण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी नमूद केले.






# दाभाडे सरकार चौकातील चार दिवसांचा अंधार संपला!

## आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा; परिसरातील नागरिकांना दिलासा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चऱ्होली येथे दाभाडे सरकार चौक परिसरातील अलंकार सोसायटीमध्ये एलटी (LT) केबल खराब झाल्यामुळे गेल्या चार दिवसांपासून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. वीजपुरवठा विस्कळीत झाल्याने सोसायटीची पाणीपुरवठा व्यवस्था ठप्प झाली होती. तसेच लिफ्ट बंद असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना दररोज त्रास सहन करावा लागत होता.**



या गंभीर समस्येची माहिती मिळताच, भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी तातडीने महावितरणच्या संबंधित विभागाशी संपर्क साधून प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या सूचनेनुसार आणि प्रशासनाच्या समन्वयातून तब्बल 150 मीटर नवीन एलटी केबल टाकण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले.

केबल बदलण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर सोसायटीचा वीजपुरवठा सुरळीत झाला असून पाणीपुरवठा पूर्ववत सुरू झाला आहे. तसेच लिफ्टही कार्यान्वित झाल्याने विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. चार दिवसांच्या या गैरसोयीमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र आमदार महेश लांडगे यांनी स्वतः लक्ष घालून प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्यामुळे समस्या तातडीने सोडविण्यात यश आले. त्यामुळे अलंकार सोसायटीतील रहिवाशांनी समाधान व्यक्त करत आमदार लांडगे यांचे आभार मानले आहेत.

स्थानिक नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत कोणतीही तडजोड न करता तत्परतेने काम करण्याची भूमिका आमदार महेश लांडगे यांनी पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. त्यांच्या सक्रिय हस्तक्षेपामुळे चार दिवसांपासून अंधार आणि गैरसोयीचा सामना करणाऱ्या अलंकार सोसायटीतील शेकडो रहिवाशांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे.

> “ नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य देणे ही लोकप्रतिनिधी म्हणून माझी जबाबदारी आहे. अलंकार सोसायटीतील वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे पाणीपुरवठा आणि लिफ्ट सेवा बंद पडून नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. ही बाब समोर आल्यानंतर संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधून नवीन एलटी केबल टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बांधकाम प्रकल्पांचा पाणीपुरवठा बंद करा!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बांधकाम प्रकल्पांना होणारा पाणीपुरवठा तात्काळ बंद करून उपलब्ध पाणी नागरिकांच्या गरजांसाठी प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.**






ऐश्वर्या तरस यांनी याबाबत आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, शहरात सध्या पाण्याची उपलब्धता कमी होत असून अनेक भागांमध्ये नागरिकांना अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत आहे. किवळे-रावेत प्रभाग क्र.१६ सह विविध परिसरांमध्ये कमी दाबाने पाणी येणे, अनियमित पुरवठा होणे तसेच पिण्याच्या पाण्याची कमतरता भासत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत.

अशा परिस्थितीत नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हे महापालिकेचे प्रथम कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे शहरातील निवासी, व्यावसायिक व औद्योगिक बांधकाम प्रकल्पांना महापालिकेमार्फत अथवा इतर माध्यमांतून पुरविण्यात येणारा पाणीपुरवठा तात्पुरता स्थगित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच बांधकाम व्यावसायिकांनी बांधकामासाठी पुनर्वापरित (Recycled) पाणी, टँकर किंवा इतर पर्यायी स्रोतांचा वापर करावा, अशा सूचना देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. पाणीटंचाईच्या काळात नागरिकांच्या हिताला प्राधान्य देऊन तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी विनंती नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी प्रशासनाकडे केली आहे. शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर या मागणीची चर्चा सुरू असून महापालिका प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

> “ पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. सध्याच्या पाणीटंचाईच्या काळात उपलब्ध पाण्याला सर्वप्रथम नागरिकांच्या पिण्याच्या व दैनंदिन गरजांसाठी प्राधान्य दिले पाहिजे. बांधकाम प्रकल्प काही काळ थांबू शकतात, पण नागरिकांचे जीवन थांबू शकत नाही. त्यामुळे शहरातील सर्व बांधकाम प्रकल्पांचा महापालिकेकडून होणारा पाणीपुरवठा तात्पुरता बंद करून, बांधकाम व्यावसायिकांनी पुनर्वापरित पाणी, टँकर किंवा अन्य पर्यायी स्रोतांचा वापर करावा. पाणीटंचाईच्या या गंभीर परिस्थितीत नागरिकांना दिलासा देणारा निर्णय घेऊन महापालिका प्रशासनाने जनहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.
>
> **– ऐश्वर्या राजेंद्र तरस, नगरसेविका, शिवसेना.**

# सोसायट्यांवरील ओला कचरा धोरण व Amenity Tax मागे घ्या!

## नगरसेवक सचिन तापकीर यांची मागणी; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने सोसायट्यांवर ओल्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाची सक्ती तसेच Amenity Tax नावाने नवीन कर आकारणी करण्याचा निर्णय घेतल्यामुळे नागरिकांवर मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार असल्याची भूमिका मांडत भाजपा नगरसेवक सचिन (भाऊ) तापकीर यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन सादर केले.**



निवेदनात म्हटले आहे की, शहरातील बहुतांश गृहनिर्माण सोसायट्यांकडे कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक जागा, तांत्रिक ज्ञान आणि आर्थिक क्षमता उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत अल्प मुदतीत प्रकल्प उभारण्याची सक्ती करणे व्यवहार्य नाही. शहरातील कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी केवळ नागरिकांवर टाकण्याऐवजी महापालिकेने स्वतःची जबाबदारी पार पाडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, सोसायट्यांकडून मालमत्ता कर, पाणी कर आणि घनकचरा कर आधीच आकारला जात असताना, कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी स्वतंत्र खर्च आणि त्यावरील देखभाल खर्च लादणे म्हणजे नागरिकांवर दुहेरी आर्थिक भार टाकण्यासारखे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नियमांची अंमलबजावणी करताना दंडात्मक भूमिका न घेता नागरिक, सोसायटी फेडरेशन, तज्ज्ञ आणि लोकप्रतिनिधींशी चर्चा करून व्यवहार्य धोरण तयार करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय महापालिकेने Amenity Tax नावाने नवीन कर आकारणी करण्याचा निर्णय घेतल्यास अनेक सोसायट्यांवर दरवर्षी लाखो रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार असून, त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे सचिन तापकीर यांनी म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर ओल्या कचऱ्यावरील सक्तीचा निर्णय आणि Amenity Tax लागू करण्याचा निर्णय तात्काळ स्थगित करून, सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून नागरिकहिताचे आणि व्यवहार्य धोरण तयार करावे, अशी मागणी त्यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. नगरसेवक सचिन तापकीर यांनी प्रशासनाने दंडात्मक भूमिका न घेता सहकार्याची भूमिका स्वीकारावी, स्वतः कचरा व्यवस्थापन करणाऱ्या सोसायट्यांना करसवलत, आर्थिक मदत, तांत्रिक मार्गदर्शन व आवश्यक अनुदान द्यावे, अशीही मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

> “ पिंपरी-चिंचवडकरांवर अन्यायकारक आर्थिक भार टाकणारा कोणताही निर्णय आम्ही सहन करणार नाही. नागरिक आधीच मालमत्ता कर, पाणी कर आणि घनकचरा कर भरत आहेत. अशा परिस्थितीत ओल्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाची सक्ती आणि AMENITY TAX लादणे योग्य नाही. विकासाच्या नावाखाली नागरिकांवर अतिरिक्त करांचा बोजा टाकण्याऐवजी महापालिकेने आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत प्रशासनाने दंडात्मक नव्हे, तर सहकार्याची भूमिका घ्यावी. सर्व संबंधित घटकांशी चर्चा करूनच व्यवहार्य आणि लोकहिताचा निर्णय घ्यावा. सोसायटीधारक व नागरिकांच्या हक्कासाठी आम्ही कायम ठामपणे उभे राहू.
>
> – **सचिन तापकीर, नगरसेवक, भाजपा.**

# अंमली पदार्थविरोधी जनजागृतीसाठी ६ व्या ‘स्माईल सायक्लोथॉन’चे आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थविरोधी दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, स्माईल डी-ॲडिक्शन सेंटर आणि गुन्हे शाखेच्या ॲंटी नार्कोटिक्स सेल यांच्या संयुक्त विद्यमाने ‘६ वी स्माईल सायक्लोथॉन’ आयोजित करण्यात आली आहे. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे, युवकांना व्यसनापासून दूर ठेवणे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**




शनिवार, २७ जून २०२६ रोजी सकाळी ६.३० वाजता पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय, चिंचवडगाव येथून सायक्लोथॉनला प्रारंभ होणार असून उर्से येथील स्माईल डी-ॲडिक्शन सेंटर येथे तिचा समारोप होईल. ‘पेडल फॉर अ कॉज’ या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून अंमली पदार्थमुक्त आणि आरोग्यसंपन्न समाजाचा संदेश देण्यात येणार आहे.

अंमली पदार्थांचे वाढते सेवन ही आजच्या समाजासमोरील गंभीर समस्या बनली आहे. विशेषतः युवकांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याने त्याविरोधात व्यापक जनजागृतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या सायक्लोथॉनमधून ‘आरोग्याची निवड करा, अंमली पदार्थांना नकार द्या’ हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

## नागरिकांना आवाहन...

या सायक्लोथॉनमध्ये विद्यार्थी, युवक, क्रीडाप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकलेल्या व्यक्तींना नवजीवन देण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याची गरज असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. “प्रत्येक पेडल हे व्यसनमुक्त समाजाच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे,” या संदेशासह आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाद्वारे अंमली पदार्थांविरोधातील लढा अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. नागरिकांनी या जनजागृती मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून व्यसनमुक्त आणि निरोगी समाज घडविण्याच्या अभियानाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सहभागासाठी संपर्क :

सायक्लोथॉनमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी किंवा अधिक माहितीसाठी ९५७९६०८४५२ अथवा ८८०५६५६१९७ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वच्छता नियमभंगाविरोधात महापालिकेची मोहीम

## कचरा टाकणे, जाळणे आणि प्लास्टिकबंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पिंपरी चिंचवड महापालिकेने धडक कारवाई मोहीम हाती घेतली असून, विविध भागांत केलेल्या कारवायांमधून ४४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. रस्त्यावर कचरा टाकणे, कचरा जाळणे, बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणे तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणे, अशा प्रकारांवर ही कारवाई करण्यात आली.**





महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभाग आणि ग्रीन मार्शल पथकाने विविध भागांत तपासणी मोहीम राबविली.

रहाटणी-थेरगाव परिसरात सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या एका टेम्पोवर कारवाई करून पाच हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. विशेष तपासणीदरम्यान संबंधित वाहनातून कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

रावेत परिसरात एका व्यावसायिक आस्थापनाकडून कचरा जाळला जात असल्याचे आढळून आले. कचरा जाळल्यामुळे होणारे वायू प्रदूषण आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेऊन संबंधित आस्थापनास २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

दरम्यान, 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत आरोग्य निरीक्षक क्षितिज रोकडे व ग्रीन मार्शल पथकाने यांनी प्रभाग क्रमांक ८ मधील भाजी मंडई परिसरात विशेष मोहीम राबविली. या मोहिमेत बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे आणि अस्वच्छता करणे या प्रकारांवर कारवाई करण्यात आली. त्यातून १४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून सुमारे १० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. याशिवाय, प्लास्टिकबंदीचे उल्लंघन करणाऱ्या आणखी एका प्रकरणात पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी कचरा उघड्यावर टाकणे अथवा जाळणे यामुळे पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे सांगितले. अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी महापालिका कठोर कारवाई करत असून नागरिकांनी स्वच्छता नियमांचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले की, स्वच्छ सर्वेक्षण आणि स्वच्छ शहराच्या उद्दिष्टपूर्तीसाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक असल्याचे नमूद केले. कचरा जाळणे, उघड्यावर टाकणे अथवा बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणाऱ्यांविरोधात नियमित कारवाई सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेने नागरिकांना ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजी योग्य कचऱ्याचे विलगीकरण करून तो घंटागाडीमार्फत देण्याचे आवाहन केले आहे. तसेच स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा आस्थापनांची माहिती प्रशासनाला कळविण्याचेही आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

# एमआयटीमध्ये 'AI-Powered Academic Excellence' दोन दिवसीय कार्यशाळा यशस्वी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



### AI विषयक ज्ञानात भर, संस्थेसाठी सकारात्मक

या प्रशिक्षणामुळे प्राध्यापकांच्या AI विषयक ज्ञानात व प्रत्यक्ष वापर कौशल्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, अध्यापनाची गुणवत्ता, संशोधनाची परिणामकारकता, शैक्षणिक दस्तऐवजीकरण, प्रशासकीय कार्यक्षमता आणि संस्थेच्या एकूण कार्यप्रदर्शनात सकारात्मक बदल घडण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**एमआयटी कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (AUTONOMOUS), आळंदी येथे १७ व १८ जून २०२६ रोजी "AI-POWERED ACADEMIC EXCELLENCE" या विषयावरील दोन दिवसीय प्राध्यापक विकास कार्यशाळा उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडली.**

या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुजित शिंदे लाभले. उच्च शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा अध्यापन, मूल्यमापन, संशोधन आणि शैक्षणिक प्रशासनात प्रभावी वापर कसा करता येईल, याबाबत त्यांनी सखोल आणि प्रात्यक्षिकाधारित मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, मूल्यमापन व परीक्षा प्रणाली, संशोधन व शोधनिबंध प्रकाशन, मानांकन व गुणवत्ता हमी, व्हिजन २०३० व संस्थात्मक विकास, शैक्षणिक प्रशासन तसेच दैनंदिन शैक्षणिक कामकाजात AI चा उपयोग अशा विविध विषयांचा समावेश होता. तसेच Prompt Engineering, शिक्षकांसाठी आवश्यक AI कौशल्ये, AI Connectors, AI-आधारित प्रकल्प, Token Optimization Techniques, AI प्रोफाइल वैयक्तिकरण आणि ChatGPT, Claude, Perplexity यांसारख्या AI प्लॅटफॉर्म्सचा शैक्षणिक गरजांनुसार परिणामकारक वापर यावर विशेष भर देण्यात आला.

कार्यशाळेचे स्वरूप पूर्णतः Hands-on आणि कृती-आधारित होते. प्रत्येक सत्रात प्रत्यक्ष सराव, गटचर्चा व प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे सहभागी प्राध्यापकांना AI साधनांचा प्रत्यक्ष वापर करून त्यांची उपयुक्तता समजून घेण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, उपसंचालक, अधिष्ठाता, विभागप्रमुख तसेच सर्व विभागांतील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहभागी प्राध्यापकांनी कार्यशाळेतील विविध सत्रांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. मंगेश भोपळे, एफडीपी समन्वयक वंदना पगार, डॉ. दीक्षा कदम आणि डॉ. सुनील पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. नियोजन, अंमलबजावणी, तांत्रिक समन्वय आणि सहभागी व्यवस्थापनात त्यांच्या योगदानामुळे कार्यशाळा प्रभावीपणे पार पडली.

MIT | Arts, Commerce & Science College